दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • मंगळवार दि.३१ मार्च २०२६ • अंक-७७ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


## ओळख असणे म्हणजे गुन्ह्यात सहभाग नव्हे

**मुंबई**-भोंदू अशोक खरात प्रकरणात नाव ओढले गेल्याने शिवसेना नेते आणि आमदार दीपक केसरकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. अनेक नेत्यांचे खरातसोबतचे फोटो समोर आले आहेत, मात्र केवळ ओळख असणे म्हणजे संबंधित व्यक्तीच्या कृत्यात सहभागी असणे असा होत नाही, अशा शब्दांत केसरकर यांनी आपले स्पष्टीकरण दिले. या प्रकरणाशी आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न हा केवळ राजकीय द्वेषापोटी केला जात असून, यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आघाडीवर असल्याचा थेट आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.आमदार दीपक केसरकर यांचा नाशिकच्या बहुचर्चित अशोक खरात प्रकरणात संबंध असल्याचा आरोप होत आहे.

# उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांची अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने घेतली सदिच्छा भेट

## उपराष्ट्रपती यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी चैत्यभूमी येथे येण्याचे शिष्ट मंडळाचे निमंत्रण

**मुंबई । प्रतिनिधी**

भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने उपराष्ट्रपती भवन येथे सदिच्छा भेट घेतली.या भेटीत १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त चैत्यभूमी येथे उपस्थित राहण्याची विनंती उपराष्ट्रपतींना करण्यात आली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उपराष्ट्रपतींनी तत्काळ होकार दर्शवला.यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत असताना चैत्यभूमीला दिलेल्या भेटींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच दादर येथे सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कामाबाबतही त्यांनी शिष्टमंडळाकडे माहिती घेतली. स्मारकाच्या कामाला अधिक गती मिळावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, बोधगया संबंधित प्रश्नावरही शिष्टमंडळाने उपराष्ट्रपतींसोबत औपचारिक चर्चा केली.या प्रसंगी शिष्टमंडळाकडून उपराष्ट्रपतींना गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.या भेटीत सुनील मगरे, सिद्धार्थ बनसोडे, नागसेन कांबळे, भदंत राहुल बोधी, बाळासाहेब करडक, आनंद चंदनशिवे, संजय अवसरमोल, शिल्पकार अनिल सुतार,सुबोध भारत, विजय अंभुरे आणि रामनाथ दवणे आदी उपस्थित होते.



## ठाण्यात जुन्या भांडणाच्या रागातुन जीवे ठार मारण्यासाठी गोळीबार करणारा अटकेत



**संतोष पडवळ । ठाणे**

ठाण्यात शेल पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याकरीता फिर्यादी इंजमाम सिध्दीकी वय २६ वर्षे, हे त्यांची गाडी ॲक्टीव्हा क्रं. चक ०४ चइ १०६५ यात पेट्रोल टाकण्यासाठी आले असता यातील आरोपी जबीउल्ल खान याने मागील दोन महिन्यापुर्वी तेरा बाप कैसे मरा, ट्रेन से कटकर मराना, कुत्ते के मौत असे फिर्यादी यांचे वडीलांबददल अपशब्द वापरल्याचे कारणावरून त्यांच्यात वारवार भांडण होत असल्याने त्याचा राग मनात धरून फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने कोणत्यातरी बनावटीच्या अग्निशस्त्राने त्यांच्यावर दोन राउंड फायर करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांची मैत्रीण इंजल फर्नांडीस हीस बंदुकीचा धाक दाखवून फिर्यादी यांची गाडी जबरीने घेवून गेले याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नौपाडा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ८४/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९ (१), ३०९ (४),३५१ (३), ३५२ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह महा. पो. कायदा कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील आरोपी याने सदर गुन्हा केले नंतर त्याचे वापरते मोबाईल क्रमांक बंद करून आपले अस्तित्व लपवुन राहत होता. सदर आरोपीस पकडणे पोलीसांना समोर एक आव्हाहन ठरले होते. मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे सलग दोन दिवस आरोपीच्या शोधात असताना पो.ना/७१८३ सुनिल धोंडे यांना त्यांचे गुप्तबातमीदारामार्फत मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून सदर आरोपी हा रोड नं. ०२, कुसुमाग्रज मार्ग, समतानगर चौक, वागळे ईस्टेट, ठाणे या ठिकाणी येणार असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने पोलीस पथकाचे मदतीने सापळा रचुन दिनांक २९/०३/२०२६ रोजी सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीची अंगझडती घेता त्याचे अंगझडतीमध्ये त्याने गुन्हयात वापरलेले एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र (पिस्टल) व गुन्हयात चोरीस गेलेली पांढ-या रंगाची ॲक्टीवा मोटारसायकल हस्तगत करण्यातआली सदर गुन्हयाचा तपास सपोनि भांगे करीत असुन आरोपीस मा. न्यायालयात हजर करून त्याची दिनांक ०२/०४/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

## नवी मुंबईतील सर्व महापालिका शाळा इंग्रजी माध्यमातून सुरु करण्याच्या प्रस्तावाला काँग्रेसचा कडाडून विरोध

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षण मातृभाषेतच हवे; काँग्रेस उपाध्यक्ष संतोष सुतार यांचे महापालिका आयुक्तांना पत्र नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने नुकताच पालिकेच्या सर्व शाळा इंग्रजी माध्यमातून सुरू करण्याचा जो प्रस्ताव मंजूर केला आहे, त्याला नवी मुंबई काँग्रेस कमिटीने तीव्र विरोध दर्शवला आहे. नवी मुंबई काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. संतोष सुतार यांनी आज महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना यासंदर्भात एक सविस्तर पत्र देऊन हा प्रस्ताव तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना दिलेल्या पत्रात श्री. संतोष सुतार यांनी स्पष्ट केले आहे की, पालिकेचा हा निर्णय नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या (छ्लींळेपरश्र एर्वीलरींळेप झेश्रळलू) मूळ उद्देशालाच हरताळ फासणारा आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांचे सुरुवातीचे शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतूनच होणे बंधनकारक आणि



अभिप्रेत आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे मुलांच्या आकलन क्षमता वाढतात, त्यांच्या संकल्पना स्पष्ट होतात आणि त्यांचा सर्वांगीण दृष्ट्या योग्य विकास होतो.मातृभाषेतून मुख्य शिक्षण देऊन, त्याच्या जोडीला इतर भाषा जसे की हिंदी किंवा इंग्रजी शिकवून विद्यार्थ्यांना सुशिक्षित करणे हे अधिक संयुक्तिक आणि वैज्ञानिकदृष्ट्या योग्य आहे. इंग्रजी भाषेचे ज्ञान आजच्या काळात आवश्यक आहे हे नक्की, परंतु त्यासाठी संपूर्ण शाळाच इंग्रजी माध्यमाच्या करणे आणि मातृभाषेतील शाळा बंद करणे हा उपाय असू शकत नाही, असे श्री. सुतार यांनी निवेदनात म्हटले आहे.महाराष्ट्राची राजभाषा आणि इथल्या बहुतांश नागरिकांची मातृभाषा ही 'मराठी' आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा कोणत्याही परिस्थितीत आणि कोणत्याही अटीवर 'मराठी' माध्यमातच असणे अत्यंत गरजेचे आहे. मराठी शाळा टिकवणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे ही स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.
महानगरपालिकेने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करून मराठी माध्यमाच्या शाळा कायम ठेवाव्यात आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तिथे उत्तम दर्जाचे शिक्षण, तसेच हिंदी व इंग्रजी भाषांचे स्वतंत्र आणि दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे. जर प्रशासनाने मराठी शाळांच्या अस्तित्वाला धक्का लावण्याचा किंवा केवळ इंग्रजी शाळांचा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न केला, तर नवी मुंबई काँग्रेसच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही श्री. संतोष सुतार यांनी या पत्राद्वारे दिला आहे.

## उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत । जयेश जाधव**

अखंड पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेच्या वतीने उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायत मधील उमरोली आदिवासी वाडीमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या हस्ते महापुरुषांना हार घालून कार्यक्रम सुरू करण्यात आला.या आरोग्य शिबिरात डोळे तपासणी, बीपी,शुगर, ताप, गुढघे दुखी,वजन, व सामान्य चाचण्या आणि औषधे वाटप करण्यात आले.



या शिबिरात १५७ नागरिकांनी या आरोग्य शिबिरात सहभाग घेऊन आपल्या आजाराचे निदान करून घेतले. तसेच वाडीतील लहान मुलांना बिस्कीट आणि चॉकलेट खाऊ देण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमात अ. पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व हिंद (आरक्षी) पोलिस फ्रेंड असोसिएशन नवी दिल्ली संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ. ज्ञानेश्वर साळोखे, डॉक्टर विशाल बनसोडे, डॉक्टर समीक्षा संतोष भोईर, आयडीबीआय बँक असिस्टंट मॅनेजर निशांत म्हैसने,पोलिस पाटील गणपत वाघमारे, कार्याध्यक्ष सचिन लोंगले, नरेश लोंगले,राम वाघमारे, बाबू पवार, गणपत वाघमारे, शंकर मुकणे, सुनील जाधव, दत्तात्रेय वाघमारे, पांडुरंग मुकणे,तसेच गुड शेपट कॉन्व्हेन्ट शिक्षिका माधुरी साळोखे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# भिगवण बाजारपेठेत हापूस आंब्याचे आगमन पहिली पेटी तब्बल १४ हजारांना विक्री

**भिगवण । अरुण भोई**

भिगवण येथील बाजारपेठेत रत्नागिरी-देवगड हापूस आंब्याच्या पेट्यांचे आगमन झाले असून, यंदा तब्बल एक महिना उशिराने हापूस दाखल झाल्याने आंबाप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये हापूस आंबा लवकर उपलब्ध होत असला, तरी ग्रामीण भागात तो उशिरा येत असल्याचे चित्र यावेळीही दिसून आले.



फळांचा राजा म्हणून ओळख असलेल्या हापूस आंब्याला यंदा हवामानातील बदलांचा मोठा फटका बसला आहे. नोव्हेंबरपर्यंत झालेल्या पावसामुळे कलमांना उशिरा पालवी फुटली, मोहरही उशिरा आला. त्यानंतर पडलेल्या कडाक्याच्या थंडी व धुक्यामुळे मोहरावर परिणाम झाला. तसेच थ्रिप्सच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. सुरुवातीला ८० ते ९० टक्के मोहर लागला असला तरी प्रत्यक्षात यंदा केवळ २० टक्केच उत्पादन उपलब्ध होणार असल्याची माहिती गणपतीपुळे (मालगुंड) येथील बागायतदार विद्याधर पुसाळकर यांनी दिली.

दरम्यान, भिगवण येथील आंबा व्यावसायिक संतोष सोनवणे यांच्या दुकानात हापूस आंबा पेटी पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पहिली पेटी तब्बल १४,००० रुपयांना ज्योती हॉटेलचे चंद्रशेखर पवार यांनी खरेदी केली. दुसरी पेटी डॉ. संजय भोसले, तिसरी पेटी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती पराग जाधव, चौथी पेटी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक रामदास झोळ, पाचवी पेटी पंचरत्न हॉटेलचे अविनाश गोलांडे, तर सहावी पेटी महेंद्र भोगावत यांनी समान दरात खरेदी केली.

पेटीचे पूजन चंद्रशेखर पवार, पराग जाधव, सरपंच गुरप्पा पवार, जवाहर रायसोनी, तुकाराम बंडगर, बापूराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत चवरे यांनी केले.

# शैक्षणिक प्रश्नांवर आमदार अमित साटम यांच्यासमवेत विचारविनिमय सभा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील नऊ प्रमुख शैक्षणिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने विविध शैक्षणिक समस्या व धोरणात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यासाठी मा. आमदार अमित साटम यांच्या उपस्थितीत दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता अंधेरी (पश्चिम) येथील चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटर स्कूल येथे विचारविनिमय सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेमध्ये महामुंबई शिक्षण संस्था संघटना, अनएडेड स्कूल्स फोरम, प्रायव्हेट अनएडेड स्कूल्स मॅनेजमेंट असोसिएशन, शिक्षक संघटना आदी विविध संघटनांचा सहभाग असून या संघटनांच्या माध्यमातून राज्यातील सुमारे साडेचार हजारांहून अधिक शैक्षणिक संस्था तसेच ३५ हजारांहून अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व केले जाणार आहे. सभेदरम्यान शाळांच्या मान्यता प्रक्रियेतील अडचणी, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न, शिक्षकांना निवडणूक व इतर अशैक्षणिक कामांपासून सूट, पायाभूत सुविधा व छइउ प्रमाणपत्राबाबत सवलती, शाळांवरील करांचा प्रश्न, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भातील अडथळे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर मांडणी केली जाणार आहे. याशिवाय अल्पसंख्यांक, स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित इंग्रजी माध्यम शाळांच्या समस्या व त्यावरील उपाययोजनांवरही चर्चा होणार आहे.प्रत्येक संघटनेच्या वतीने निवडक प्रतिनिधींमार्फत अचूक, अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ पद्धतीने समस्यांचे सादरीकरण करण्यात येणार असून, शासनाच्या धोरणांवर टीकात्मक भूमिका न घेता सकारात्मक बदलांच्या अपेक्षांवर भर दिला जाणार आहे.

# बाणेर –बालेवाडीत वाहतूक कोंडी होत असेल तर रोडवर लागत असलेले वाहने

**पुणे । रमेश जयस्वाल**

।। याला कारणीभूत वाहतूक विभाग यावर लक्ष नाही फक्त वसूलीतचं वाहतूक विभागाचे लक्ष आणि म्हणतात मॅन पावलं कमी आहे यात वाहतूक विभागाचे निरिक्षक यांचे लक्ष फक्त अर्थकारणात ? ।।

पुणे विभागातील बाणेर आणि बालेवाडी,सूस,पाषाण विभागात वाहतूक विभागाचा अनागोंदी कारभार सूरू आहे मन्यूष्यबळ कमी म्हणून कोणत्याही चौकात एकही वाहतूक कर्मचारी हजर नसतो आणि जर हजर असलातरी सावज शोधत एका कोप-यात उभा असलेल्याचे चित्र आहे यात बाणेर माऊली पेट्रोल पासून चतू:श्रृगी वाहतूक पोलिसांचा विभाग येतो तर पाषाण मधील काही विभाग बावधन वाहतूक पोलिस विभागात येतो बाणेर माऊली पेट्रोल पंप ते बालेवाडी आणि काही हायवेचा विभाग बाणेर वाहतूक विभागाकडे येत आहे इतका कमी विभाग बाणेर वाहतूक पोलिस विभागात येतो त्यात बालेवाडी फाटा,गणराज चौक,राधा चौक, दसरा चौक इतका कमी विभाग मेन येत असतांनाही मन्यूष्यबळ कमी म्हणून काहीही सबब पूढे करत आहे माऊली पेट्रोल पंप ते



राधा चौक पर्यंतच्या दोन्ही बाजूला रोड वरचं चार चाकी आणि दोन चाकी वाहने लागलेले असतात या कारणाने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे रस्ता कमी आणि रोडवर वाहने कोणत्या नियमाने लागलेले असतात याचा विचार वाहतूक विभागाचे अधिकारी यांनी कधी लक्ष देऊन कारवाई आज पर्यंत का केलेली नाही तसेच चतू:श्रृंगी वाहतूक पोलिसांचे फक्त वसूली वरचं लक्ष आहे यात बाणेर वाहतूक पोलिस कोठे कमी राहणार फक्त वसूली करायची आणि चौकाच्या बोजवारा उडाला आणि वाहतूक कोंडी झाली तरी यांना याचे काही घेणे देणे नाही बाणेर,चतू:श्रृंगी,बावधन या विभागातील वाहतूक पोलिस फक्त वसूली करून आपले टार्गेट कसा पूर्ण होईल आणि आपले प्रमोशन कश्या प्रकारे होईल आणि वरिष्ठा पर्यंत आपले इमेज कशा प्रकारे होईलचं यातचं वाहतूक पोलिस गूंतलेले आहे प्रत्यक्षात हा प्रकार फक्त वरिष्ठांना आपल्या विभागाची आणि आपली इमेज करिता सर्व सूरू आहे मग यात वाहतूक कोंडी होत असली तरी यांना याचे घेणे देणे नाही आपली वसूलीची जत्रा बाहेरचा व्यक्ती कडून होते मग आपले सर्व आलबेल असल्याचे चित्र वरिष्ठांना दाखविण्याचा प्रयत्न या तीनही वाहतूक विभागा कडून सूरू आहे डंपर,जड वाहने ट्रक,यांना काही काळ बंदी असतांनाही अर्थकारण करून दिवसभर हे वाहने रोजचं धावतात याची कल्पना वरिष्ठांना नाही काय ? कोठे तरी पाणी मूल्ये हे सर्व वाहने रोडवर धावणारे राजकारण्यांचे आहे मग तुम्ही खां आणि आम्हालाही मलीदा लाटू द्या यात सर्वसामान्य जनता आणि वाहन चालक कोंडीच्या माध्यमातून भरडली जात आहे.

# रेवदंड्यात महिला सक्षमीकरणाचा नवा संदेश पोलीस–माविम बैठकीत मान्यवरांचा गौरव

**रेवदंडा । ओमकार नागावकर**

रेवदंडा पोलीस ठाण्यात पोलीस व माविम मित्र मंडळ यांची संयुक्त बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सहायक पोलिस निरीक्षक बी. के. जाधव होते.

बैठकीदरम्यान माविमच्या व्यवस्थापक शमीन चौधरी यांनी महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत, त्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर सविस्तर प्रकाश टाकला. विधी सेवा प्राधिकरणाच्या स्वयंसेविका वैशाली यांनी महिलांना कायदेशीर अडचणींसाठी दर शनिवारी रेवदंडा पोलीस ठाण्यात मोफत सल्ला व वकिलांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्याचे सांगून या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.महिला पोलीस हवालदार संजिवनी म्हात्रे यांनी महिलांनी आर्थिक व्यवहार करताना सजग व डोळसपणे



निर्णय घेण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी एपीआय श्री. जाधव यांनी महिलांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरू करून आर्थिक सबलीकरण साधावे, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती करून घेत त्यांचा लाभ घ्यावा, असे मार्गदर्शन केले. घरच्या घरी करता येणाऱ्या उद्योगांची संधी ओळखून त्यासाठी मानसिक तयारी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, तरुण पिढी वाढत्या व्यसनाधीनतेकडे झुकत असल्याबद्दल चिंता व्यक्त करत, शारीरिक व मानसिक सक्षमता वाढवण्यासाठी पालकांनी जागरूक राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा माजी एसीपी (ठाणे वाहतूक शाखा) रमेश लक्ष्मण धाटावकर (रेवदंडा) व सेवानिवृत्त शिक्षक प्रकाश प्रभाकर पाटील (सागमळा, चौल) यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी प्रकाश पाटील यांनी माविमच्या कार्याचे कौतुक करत, महिला सक्षमीकरणासाठी पुरुषांनीही सहकार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला ओम साई प्रेरणा साधन केंद्राच्या उपाध्यक्षा शलाका राऊत, कोषाध्यक्षा सुनित्रा भुर्के यांसह इतर समन्वयक उपस्थित होते.

# दिव्यात बस थांबा/शेड अभावी प्रवासी भर उन्हात;प्रशासनासह लोकप्रतिनिधिंचे अपयश

**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा रेल्वे स्थानकात लोकल प्रवास करण्यासाठी प्रवाश्यांना जीवघेणा प्रवास करावा लागतो परंतू आता भर उन्हाळ्यात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बस थांब्यावर निवारा शेड अभावी ४० च्या आसपास वाढलेल्या तापमानात उभे रहावे लागत आहे. सदर चौकातून ठाणे महानगरपालिकेच्या टी.एम.टी, नवी मुंबईच्या एन.एम.एम.टी. बसेसची नेहमीच वर्दळ पहायला मिळते. मात्र, जिथे टी. एम.टी. बसचे थांबे आहेत त्या ठिकाणी प्रवाशांना ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशी गैरसोय पहायला मिळत आहे. त्यामुळे विशेषतः विद्यार्थी, गरोदर महिला, आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पहायला मिळत असून, संबंधित ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने शिळफाटा जंक्शन नाक्यापासून ते दिव्यापर्यंत प्रमुख मार्गांवर हक्काचे शेडसह बस थांबे उभे करावे अशी आग्रही मागणी होत आहे.



विशेष म्हणजे अनेक ठिकाणी बस थांब्याजवळ खासगी वाहतूक करणाऱ्या वाहने उभी असलेली पहायला मिळतात. त्यामुळे, नाइलाजस्तव आलेल्या बसेस भर रस्त्यावर उभ्या राहत असल्याने, त्यातून मार्ग काढत प्रवाशांना बसमध्ये चढताना तारेवरची कसरत करावी लागते. दरम्यान, प्रवाशांचा चांगला प्रतिसाद ठाणे महानगरपालिकेच्या टी. एम.टी, नवी मुंबई महानगरपालिकाच्या एन.एम.एम.टी. मिळत असूनही, मूलभूत सोयी-सुविधां अभावी प्रवासी वंचित रहात असल्याचे वास्तव परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, सार्वजनिक वाहतूक सक्षम केली पाहिजे, असे मत अनेक संस्था, संघटनांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे, ठाणे आणि नवी मुंबई कडून येणाऱ्या व जाणाऱ्या टी.एम.टी. आणि एन.एम.एम.टी.बसच्या फेऱ्यासुद्धा वाढविण्यात आल्या त्यास नागरिकांनी सुद्धा चांगला प्रतिसाद दिला. दिवसभर दिवा परिसरातील सर्वच बसेस प्रवाशांनी तुडुंब भरून ये जा करतात. मात्र ज्या ठिकाणी बसेस थांबतात त्या ठिकाणी, अधिकृत बस थांबा निदर्शनास पडत नसल्याने तसेच प्रवासी भर उन्हात बसची वाट पाहत उभे असतात. शिळफाटा जंक्शन नाका, खार्डीगांव, दिवा प्रभाग समितीसह परिसरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला उत्तम प्रतिसाद देत असूनही, प्रवाशांना मात्र ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशा गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. याकडे, ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. दिव्यातील प्रवाश्यांना सुविधा मिळत नसल्याने हे दिवा शहरातील सर्व लोकप्रतिनिधिंचे अपयश असल्याचे प्रवाश्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

# पनवेलमध्ये सौर प्रकल्प निर्मिती व आधुनिक महिला सुविधा केंद्र उभारा-ममता प्रितम म्हात्रे

## पनवेल महानगरपालिकेत महिला सन्मान स्वच्छता अभियान व सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी आज महापौरांकडे दोन महत्त्वपूर्ण व दूरदृष्टीपूर्ण प्रस्ताव निवेदनाद्वारे सादर केले.यामध्ये महिला सन्मान स्वच्छता अभियान अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अत्याधुनिक पिंक टॉयलेट्स (महिला सुविधा केंद्र) उभारण्याचा व्यापक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ही केंद्रे केवळ सार्वजनिक स्वच्छतागृह नसून महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य व सन्मान लक्षात घेऊन विकसित केलेली बहुउद्देशीय सुविधा केंद्रे असतील.

या पिंक टॉयलेट्समध्ये आधुनिक व स्वच्छ शौचालयांसोबतच सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन, वापरलेल्या नॅपकिन्सच्या सुरक्षित विल्हेवाटीसाठी इन्सिनरेटर, तसेच स्तनपान करणाऱ्या मातांसाठी स्वतंत्र 'हिरकणी कक्ष' उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने केंद्रांच्या बाह्य भागात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येईल तसेच २४ तास महिला रक्षकांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव आहे.या सुविधा केंद्रांमध्ये सौर ऊर्जा (Solar Power) वापर, पावसाच्या पाण्याचे




आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'मन की बात' मधून नैसर्गिक ऊर्जास्त्रोतांना दिल्या जाणाऱ्या प्राधान्याच्या धर्तीवर, असे स्मार्ट व शाश्वत प्रकल्प पनवेलमध्येही राबविणे ही काळाची गरज आहे. पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सौ.ममता म्हात्रे यांनी मांडलेले महिला सन्मान स्वच्छता अभियान आणि सौर ऊर्जा प्रकल्प हे अत्यंत दूरदृष्टीपूर्ण आणि लोकहिताचे प्रस्ताव आहेत. महानगरपालिकेने या प्रस्तावांचा गांभीर्याने विचार करून त्यांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी आमची अपेक्षा आहे.

– प्रितम जनार्दन म्हात्रे,भाजप नेते, पनवेल

संकलन (Rainwater Harvesting) आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळण्यासाठी पॅनिक बटण (Emergency Alarm) यांसारख्या स्मार्ट सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

शहरातील प्रमुख वर्दळीची ठिकाणे जसे की रेल्वे स्थानके, बाजारपेठा, बस स्थानके, उद्याने व शासकीय कार्यालय परिसर येथे पहिल्या टप्प्यात २५ ते ५० पिंक टॉयलेट्स उभारण्याचा आराखडा सादर करावा अशी मागणी केली आहे.या प्रकल्पासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तसेच विविध उद्योगांच्या उडठ निधीचा वापर करून महापालिकेवरील आर्थिक भार कमी ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या केंद्रांचे व्यवस्थापन स्थानिक महिला स्वयं-सहायता गटांकडे (Self Help Groups) देऊन महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रमही या योजनेत समाविष्ट आहे.

या उपक्रमामुळे महिलांच्या आरोग्याशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होणार असून पनवेल शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ व महिलांसाठी अनुकूल शहर म्हणून विकसित होण्यास मोठी चालना मिळणार आहे. तसेच राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान व हरित ऊर्जा धोरण अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबतही विस्तृत प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रकल्पाद्वारे सोसायटी स्तरावर वीज निर्मिती, कॉमन सुविधांसाठी ऊर्जा पुरवठा, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा तसेच नेट मीटरिंगचा वापर यांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वीज खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना मिळणार आहे.

या दोन्ही प्रकल्पांसाठी PPP (Public-Private Partnership) व उडठ निधीचा वापर करण्याचा प्रस्ताव असून, स्थानिक महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.सौ. ममता म्हात्रे यांनी या प्रस्तावांमुळे पनवेल शहरात महिला सुरक्षा, स्वच्छता व हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मोठी प्रगती होऊन शहर मॉडेल सिटी म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच संबंधित विभागांना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून हे प्रकल्प तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# नवी मुंबईची जनता हीच नवी मुंबईची शिल्पकार आहे-वनमंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई । दिलीप काकनाटे**

नवी मुंबईचा खरा शिल्पकार ही नवी मुंबईतील जनताच आहे मी मात्र निमित्त आहे असे प्रतिपादन राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी ऐरोली च्या ४० प्लस मैदानात भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी ते बोलत होते नगरसेवक बंडू केणी यांनी पहिल्यांदाच दिवा गावात नवी मुंबई शिल्पकार चषक २०२६ ही नवी मुंबई स्तरावर असलेल्या ऐरोली येथील डी मार्ट जवळील ४० प्लस मैदानात भव्य क्रिकेट स्पर्धा भरवली होती या स्पर्धेचे उद्घाटन रविवारी २९ मार्च रोजी वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले मैदानात डेब्रिज माती दगड यांचे ढिग होते मात्र बंडू केणी यांनी स्वखर्चाने हे मैदान तयार करून दिवा गाव व परिसरातील खेळाडूंसाठी मैदान तयार करून दिले ही खरोखरच कौतुकास्पद बाब असून तुम्ही नवी मुंबई व पंचक्रोशीतील लोकांची सोय केली आहे दिवा गावातील सर्व लोकांना व परिसरातील युवकांना एकत्र घेऊन आता तुम्ही विधायक काम करा असा सल्लाही गणेश नाईक यांनी बंडू केणी यांना दिला यावेळी स्थायी समिती सभापती अशोक पाटील विधी समितीचे उपसभापती शिवाजी खोपडे यांच्यासह जी एस पाटील सिताराम मढवी सुदर्शन जिरगे येशपाल ओवाळ स्पर्धेच्या आयोजक बंडू केणी व त्यांच्या पत्नी आधी मांण्यवर उपस्थित होते या कार्यक्रमात वनमंत्री गणेश नाईक यांना बंडु केणी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. सोबतच व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचा सन्मान आयोजकांच्या वतीने करण्यात आला.



**ठाणे बेलापूर पट्टीतील ३३ संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला होता संघाकडून कुठलेही शुल्क किंवा इंट्री फी घेतलेली नाही नवी मुंबई शिल्पकार चषक २०२६ या नावाने चषक व प्रत्येक खेळाडूला विविध प्रकारचे वैयक्तिक पारितोषिक देण्यात आले ही स्पर्धा तीन दिवस सुरू होती असे आयोजक नगरसेवक बंडू केणी यांनी यावेळी सांगितले.**

# केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात प्रा.जीवन जाधव,डॉ.रश्मी जाधव व डॉ.प्रा.गौतम बेंगाळे यांचा प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रा.जीवन जाधव, महिला सरचिटणीस डॉ.रश्मी जीवन जाधव तसेच लॉर्ड बुध्दा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी निर्माण कृती समितीचे प्रमुख संयोजक डॉ.प्रा.गौतम बेंगाळे यांनी आपल्या समर्थकांसह रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडिया या

पक्षात प्रवेश केला.रामदास आठवले यांनी त्यांच्या गळ्यात निळ्या पट्टा घालून त्यांचे स्वागत केले.डॉ प्रा.गौतम बेंगाळे यांनी रामदास आठवले यांचा मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.व शासनाने पुणे येथील पुरंदर तालुक्यातील मौजे घेरा येथे लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी स्थापन करावी अशी मागणी पत्राद्वारे केली. विक्रोळी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूल सभागृहात हा पक्ष प्रवेश सोहळा रविवारी दि.२९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.या प्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी प्रा.जीवन जाधव हे विचारवंत पॅंथर असून त्यांनी आम्हाला सोडले असले तरी आम्ही त्यांना सोडले नाही.असे सांगितलेरिपब्लिकन चळवळीत ज्यांना जे काही शक्य नाही ते सर्व काही मला मिळाले आहे.पदासाठी मी कुठल्याही पक्षात गेलो







नाही.सत्तेच्या पदापेक्षा कार्यकर्ता पद महत्वाचे आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा निळा झेंडा गावागावात पोहोचवायचा आहे.अनेक पक्षात लोक जाताना पाहतो आहे. मी तीन वेळा निवडून आलो पण पक्षाच्या चिन्हावर लढलो.काँग्रेस व राष्ट्रवादीचे चिन्ह घेतले नाही.असा दावा रामदास आठवले यांनी केला आहे.रिपब्लिकन ऐक्यासाठी मी नेहमीच आग्रही आहे.ड प्रकाश आंबेडकर, प्रा जोगेंद्र कवाडे,गवई यांनी एकत्र यावे ही माझी नेहमीच आग्रही भूमिका राहिलेली आहे.पण रिपब्लिकन ऐक्य होत नाही अशी खंत रामदास आठवले यांनी व्यक्त केली.रिपब्लिकन पक्षात सर्व जाती धर्माचे लोक असून त्यांना निळ्या झेंड्याखाली एकत्र आणावयाचे आहे.सध्याच्या युध्दावर भाष्य करताना ते म्हणाले,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे की,युध्द मला नको,बुध्द हवा आहे.डॉ.रश्मी जीवन जाधव यांनी आपल्या मनोगतातून माझे वडील आरपीआयचे ४५ वर्ष कार्यकर्ते होते.असे सांगून यापुढे निष्ठेने काम करणार असल्याचे सांगून आठवले यांच्यावर कोणी फेसबुकच्या माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट टाकल्या तर त्या सहन केल्या जाणार नाही.त्यास जशास तसे उत्तर दिले जाईल असा ईशारा त्यांनी दिला.प्रा.जीवन जाधव यांनी रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात असताना वेगळ्या म्बिशनसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.होता.पण पक्ष सोडून गेलो असताना देखील आठवले यांनी पून्हा पक्षात प्रवेश दिला त्याबद्दल आठवले यांचे आभार मानले.मी त्यांची माफी मागतो.पक्षाची बदनामी होणार नाही असे काम करणार नाही.असे ते म्हणाले.आठवले मला गुरुस्थानी आहेत असे सांगताना राष्ट्रवादीत मला शरदचंद्र पवार व सुप्रिया सुळे यांनी काही दिले नाही.मला विधानपरिषदेची आमदारकी काय,या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत माझ्या मुलीला डॉ.रश्मीला साधी उमेदवारी दिली नाही.असा आरोप जीवन जाधव यांनी केला.लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी म्हणतात,आठवले नेहमीच सर्वांना हसवण्याचे काम करतात.रिपब्लिकन ऐक्याची हाक त्यांनी घातली आहे.त्यामुळे तरुणांना आवाहन करताना प्रा.जाधव यांनी तुम्ही सेना,काँग्रेस,राष्ट्रवादीत जाऊ नका गो बॅक आठवले असे ते तळमळीने बोलले.या प्रसंगी वकील, डॉक्टर व प्राध्यापक यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.त्यामध्ये डॉ.सोनली चव्हाण, सिद्धार्थ सोनावणे,ड.मंगला हिरे,डॉ.प्रा.गौतम बेंगाळे,विजय वाघमारे,पुणे आदिंचा समावेश आहे.कार्यक्रमास गौतम सोनावणे,श्रीकांत भालेराव, रमेश गायकवाड, बाळासाहेब गरुड,आशाताई लांडगे,विवेक पवार,ड, अनिल मोरे,विनोद जाधव,शीलाताई गांगुर्डे ,सो.ना. कांबळे,उमाताई रामलू, सुभदा चव्हाण,ड.अभयाताई सोनावणे,पुणे शहर आरपीआय सचिव दिनकर चंदनशिवे आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिल मोरे,अजित रणदिवे,अशोक घोक्षे,राकेश हिरे यांनी केले होते.



मारुती दुनगू यांची नुकतीच चोपणवाडी गावच्या पोलीस पाटील पदी नियुक्ती झाल्याबद्दल श्री संजीवनी मल्टीस्टेट बँकेचे सचिव संजयजी सपाटे, व कर्मचारी वृद्ध सत्कार करून शुभेच्छा देताना.छाया::–शंकर जाधव बीड



विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात मंडळाचे आजीव सभासद प्रा.जीवन जाधव यांचा ६८वा वाढदिवस मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांच्या हस्ते श्रीफळ,गुलाबपुष्प व मिठाई देऊन प्रभात विरंगुळा केंद्रात साजरा करण्यात आला.याप्रसंगी मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी यांनी भेटून त्यांना शुभेच्छा दिल्या.मंडळाचे माजी अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत,माजी अध्यक्ष व ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, मंडळाचे सल्लागार वासुदेव कदम, सी.के.सर्वगोड यांची प्रा.जीवन जाधव यांच्याविषयी गौरवपर भाषणे झाली.या प्रसंगी त्यांची कन्या डॉ.रश्मी जीवन जाधव,मंडळाचे सल्लागार चित्रोळीकार मुकुंद कुलकर्णी, संजय मयेकर, आदि मान्यवर उपस्थित होते.


# शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी सोडली रयत क्रांती संघटनेची साथ

## शिवसेनेच्या माध्यमातून फोडणार शेतकऱ्यांच्या प्रश्न वाचा

**बीड । शंकर जाधव**

राज्यात शेतकरी चळवळीच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. संघटनेतील आक्रमक, अभ्यासू आणि प्रत्येक आंदोलनात अग्रभागी असणारे राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हा अध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात समस्त बीड जिल्हा कार्यकारिणी तसेच महाराष्ट्रातील सतरा जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांसह शेतकरी कष्टकरी हितासाठी संघटनेतून बाहेर पडत विकासाचा म्हणजे शिवसेनेचा मार्ग धरला. याच पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रा.एन डी चौघुले व शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात एकत्रितपणे शिवसेनेत प्रवेश केला आहे.या प्रवेशामध्ये मराठवाडा व विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचा ओघ वाढला आहे. या मोठ्या प्रवेशामुळे शिवसेनेला मोठे बळ मिळाले असून राज्यात तरुण तर्फडदार चळवळीच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार झाली असून, राज्यातील शेतकरी संघटनांच्या राजकारणात नवे वळण मिळाले आहे.

शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी रयत क्रांती शेतकरी संघटनेतील महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तसेच बीड जिल्हा अध्यक्ष म्हणून अत्यंत प्रभावी भूमिका बजावत होते. प्रत्येक आंदोलनात अग्रभागी राहून त्यांनी संघटनेला बळ दिले होते. आक्रमक भूमिका, अभ्यासू दृष्टीकोन आणि कार्यकर्त्यांशी थेट संपर्क यामुळे ते संघटनेतील स्फोटक व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक लढवण्याची तयारी ही सुरू होती.यांच्या संघटनेतील कार्याचा आणि बांधणीचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल.



दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)